निवडणूक निर्णय अधिकारी , दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला यांचे कार्यालय, तोष्णीवाल ले-आऊट मूर्तीजापूर रोड, अकोला

Email ID-dycolvpakola@gmail.com Website- http://akola.nic.in

क्र.कक्ष19 दि.अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक / निवडणूक/कावि- 01 /2024 दिनांकः- 23/ 10/2024

दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., (मल्टिस्टेट शेडुल्ड बँक)
संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रम (2024-2029)

## सर्व साधारण सभेची सूचना

बहु राज्य सहकारी संस्था अधिनियम, 2002 च्या कलम 45 K(1) बहु राज्य सहकारी संस्था नियम 19 F (a) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सहकारी निवडणूक प्राधिकरणाने, दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला च्या सन 2024-2029 या कालावधीच्या संचालक मंडळाची निवडणुक घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला यांची नियुक्ती केली आहे.

त्यानुसार मी अजित कुंभार, निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला बहु राज्य सहकारी संस्था नियम, 2002 च्या नियम 19 (H)(4) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून यादवारे दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला चे संचालक मंडळाच्या सदस्यांची निवडणुक घेण्यासाठी सर्व साधारण सभा दिनांक 08.12.2024 रविवार रोजी सकाळी 8.00 वाजता वर्धमान भवन, जुने एस.पी. ऑफीस जवळ, अकोला ता. जि. अकोला (महाराष्ट्र) येथे संचालक मंडळ सदस्यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यन्त खालील विषयाकरिता आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

## बैठकीची विषयपत्रिका

1. निवडणुकीद्वारे 2024-2029 या कालावधीसाठी एकूण 17 मंडळ सदस्यांची निवड करणे.
2. उपविधी क्रं. 33 नुसार मतदार संघ

| | निवडून धावयाचे सदस्य |
|---|---|
| 1. सर्वसाधारण | 10 |
| 2. शाखाप्रतिनिधी (बँकेच्या मुख्यालयापासून 25 कि. मी. पेक्षा जास्त अंतरावरील शाखेच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या सभासदांमधून) | 04 |
| 3. महिलाप्रतिनिधी | 02 |
| 4. मागासवर्गीय प्रतिनिधी (अनुसूचीत जाती/जमाती) | 01 |
| | 17 |

3. **संचालक मंडळाच्या सदस्यांचा निवडणुक कार्यक्रम खालीलप्रमाणे**

| अक्र. | तपशील | तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | मतदानास पात्र असलेल्या सदस्यांच्या तात्पुरत्या यादीच प्रकाशन | 14 नोव्हेंबर 2024 ( गुरुवार ) | सकाळी 11.00 वाजता | बँकेचे मुख्य कार्यालय, अकोला आणि बँकेच्या सर्व शाखा कार्यालयामधे |
| 2 | तात्पुरत्या यादीवर आक्षेप (असल्यास) मांडण्याची वेळ | 16 नोव्हेंबर 2024 ते 19 नोव्हेंबर 2024 ( शनिवार ते मंगळवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त (प्रत्येक दिवस) | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 3 | तात्पुरत्या यादीवरील आलेल्या आक्षेपाची छाननी (असल्यास) | 20 नोव्हेंबर 2024 ते 23 नोव्हेंबर 2024 (बुधवार ते शनिवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त (प्रत्येक दिवस) | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| | मतदानासाठी पात्र असलेल्या सदस्यांच्या अंतिम यादीचे प्रकाशन | 25 नोव्हेंबर 2024 (सोमवार) | सकाळी 11.00 वाजता | बँकेचे मुख्य कार्यालय, अकोला आणि बँकेच्या सर्व शाखा कार्यालयामधे |

सत्यमेव जयते

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | नामनिर्देशन पत्र देणे व स्वीकारणे | 26 नोव्हेंबर 2024 ते 29 नोव्हेंबर 2024 (मंगळवार ते शुक्रवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त (प्रत्येक दिवस) | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 6 | प्राप्त झालेल्या नामर्निदेर्शन पत्र नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणे. | 29 नोव्हेंबर 2024 (शुक्रवार) | सायंकाळी 5.00 वाजता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 7 | प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी | 30 नोव्हेंबर 2024 (शनिवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 8 | वैध नामर्निदेर्शन पत्राची प्रसिध्दी करणे. | 30 नोव्हेंबर 2024 (शनिवार) | सायंकाळी 5.00 वाजता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 9 | नामनिर्देशन पत्रे मागे घेणे | 02 डिसेंबर 2024 (सोमवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 पर्यन्त | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 10 | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या अंतिम यादीची प्रसिध्दी करणे. | 02 डिसेंबर 2024 (सोमवार) | सायंकाळी 5.00 वाजता | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला |
| 11 | आवश्यक असल्यास मतदानाची तारीख | 08 डिसेंबर 2024 (रविवार) | सकाळी 8.00 ते सायंकाळी 4.00 पर्यन्त | वेळेवर जाहीर करण्यात येईल |
| 12 | मतमोजणी | 11 डिसेंबर 2024 (बुधवार) | सकाळी 08.00 ते मतमोजणी संपेपर्यन्त (सतत) | वर्धमान भवन, जुने एस.पी. ऑफीस जवळ, अकोला |
| 13 | संचालक मंडळ निकालाची घोषणा | 13 डिसेंबर 2024 (शुक्रवार) | सहकारी निवडणूक प्राधिकरण नवी दिल्ली यांचे मंजुरीनंतर | वर्धमान भवन, जुने एस.पी. ऑफीस जवळ, अकोला |

**टिप:-**

1) निवडणूक लढविणारा उमेदवार हा मल्टिस्टेट को- ऑपरेटिव्ह सोसायटीज अॅक्ट व रूल्स 2002, तसेच बँकेच्या उपविधि, निवडणूक नियमानुसार पात्रता धारण करणारा असावा.

i) संचालक पदाकरिता निवडणूकीमध्ये उभे राहणा-या इच्छुक सभासदाचे (उमेदवाराचे) नाव मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे.

ii) बँकेच्या उपविधी क्रं. 34(ए)(ओ) अन्वये ज्या वर्षामध्ये निवडणूक होत आहे त्या अगोदरच्या वर्षाच्या 31 मार्च रोजी सतत 2 वर्षापासून सभासदाचे नावाने बँकेमध्ये बिन बोज्याची मुदत ठेव

a) सर्व साधारण वर्गासाठी रु. 10,000/-

b) महिला प्रवर्गासाठी रु. 5000/- व

c) अनु. जाती/अनु. जमाती प्रवर्गासाठी रु. 5000/- असणे आवशयक आहे. याबाबत चा पुरावा नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

iii) 1) वैयक्तिक सभासद हा कायदा/नियम आणि बँकेचे उपविधी व निवडणूक नियमामधील तरतुदीनुसार अपात्र नसावा.

2) नामनिर्देशन अर्ज, निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात निःशुल्क मिळतील. त्यासाठी नियमानुसार अर्ज द्यावा लागेल व सदर अर्जात ज्या मतदार संघातून अर्ज भरावयाचा आहे तो नमूद करावा.

3) ज्या मतदार संघातून उमेदवारास उभे रहावयाचे आहे त्या मतदार संघाचे नाव स्पष्टपणे नामनिर्देशन पत्रावर नमूद करणे आवश्यक आहे.

4) अनुसूचीत जाती/जमाती मतदार संघातील उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्याचे संबंधित प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

5) दाखल करण्यात येणाऱ्या नामनिर्देशन पत्रासोबत रु. 5000/- अनामत ठेव जमा करणे आवश्यक आहे.

6) मतदानाचे ठिकाण अकोला, कारंजा, मंगरूळपिर, बाळापुर, मूर्तीजापूर, हिवरखेड, आकोट, मालेगाव, वाडेगाव, तेल्हारा, नागपुर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, दर्यापूर, मुंबई, चंद्रपुर, वर्धा, नांदेड, छ. संभाजीनगर, नाशिक, मतदान केंद्रे नंतर प्रसिद्ध करण्यात येतील.

7) पात्र सभासद/मतदारांची अद्यावत यादी या कार्यालयाच्या, बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांच्या नोटिस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

8) सार्वजनिक/शासकिय/निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट अंतर्गत सुट्ट्या वगळून इतर दिवस कामकाजाचे दिवस समजावे.

9) बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 च्या कलम 39(1)(0) नुसार निवडणुक प्रक्रिया सर्व साधारण सभेत घेण्यात येणार आहे, जेणेकरून सभासद मतदारांना मतदान करणे सोईचे होईल. मतदान केलेल्या सभासदांची उपस्थिती ही सर्व साधारण सभेची उपस्थिती मानली जाईल.

10) बँकेच्या सर्व पात्र मतदारांनी एकूण 17 संचालकांच्या पदासाठी मतदान करायचे आहे.

11) मतदारांनी येतांना फोटो ओळखपत्र (सार्वत्रिक निवडणुकीसाठी लागू असलेल्या पैकी एक) सोबत आणणे बंधनकारक राहील.

12) काही अपरिहार्य कारणास्तव जाहीर झालेल्या निवडणुक कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास राहील.

13) दि. 08.12.2024 रोजीच्या निवडणुकीबाबतची सूचना सर्व पात्र सभासदांना त्यांचे नोंदणी झालेल्या पत्त्यावर पाठविण्यात येत आहे.

## पदाधिकारी निवडणुकीचा कार्यक्रम
## स्थळ:- बँकेचे मुख्य कार्यालय अकोला

| | | |
|---|---|---|
| 1 | पदाधिकारी निवडणुकीचे वेळापत्रक<br>i) नामनिर्देशन पत्र सादर करणे<br>ii) नामनिर्देशन पत्र मागे घेणे<br>iii) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची यादी प्रकाशित करणे | 16 डिसेंबर 2024 (सोमवार)<br>सकाळी 11.00 ते 12.00<br>दुपारी 12.00 ते 1.00<br>दुपारी 1.00 ते 2.00 |
| 2 | नव्याने स्थापन्न झालेल्या मंडळाची बैठक आणि वैध नामांकनाच्या यादीचे प्रकाशन, मतदान (आवश्यक असल्यास) | 18 डिसेंबर 2024 (बुधवार)<br>सकाळी 11.00 पासून |
| 3 | पदाधिकारी निवडीचा निकाल जाहीर करणे | सहकारी निवडणूक आयोग नवि दिल्ली यांचे मंजुरीनंतर (Format 19N मध्ये) |

दिनांक 23 /10/2024
ठिकाण - अकोला

(अजित कुंभार, भा. प्र. से.)
निवडणूक निर्णय अधिकारी दि अकोला अर्बन
को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोला तथा जिल्हाधिकारी, अकोला